दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २०० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२० ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दिवाळीत मुंबईत 3 ठिकाणी बॉम्बहल्ला करणार, धमकीच्या फोनमुळे खळबळ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दिवाळीत मुंबईतील तीन ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणणार असल्याचा धमकीचा फोन कंट्रोल रुमला आला होता. हा फोन काल रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास आला होता. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

अंधेरीतील इन्फिनीटी मॉल, जुहूतील पीव्हीआर आणि सहारा हॉटेल या तीन ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून हल्ला करण्याची धमकी या फोनवरुन देण्यात आली होती. यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. हे तीनही ठिकाण मुंबईतील गर्दीची ठिकाण आहेत. त्यामुळे पोलिसांनी याची कसून चौकशी तसेच तपासणी केली. हा कॉल कुठून आला होता याची तपासणी करण्यात येत आहे.

पोलिसांनी या तीनही ठिकाणची तपासणी केली. या ठिकाणी संशयास्पद काहीही सापडलेले नाही. या प्रकरणाचा बीडीडीएस टीम, सीआयएफ टीमने कसून तपास केला. हा कॉल हॉसकॉल डिक्लेर करण्यात आला आहे. दिवाळीपूर्वी आलेल्या या धमकीच्या कॉलमुळे गोंधळ उडाला.

# पनवेलच्या ओरीयन मॉल येथील वाहन पार्कींग सुरक्षा धोक्यात

## एका महिन्यात शेकडो वाहनांचे नुकसान ; ग्राहक वर्ग त्रस्त

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनेवल : पनवेलच्या ओरियन मॉल मधील चार चाकी तसेच दुचाकी वाहन पार्कींग करीता मॉल मध्ये स्वतंत्र आत व्यवस्था केलेली आहे. परंतु ओरियन मॉल व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे तसेच बांधकाम करतेवेळी ग्राहकांच्या चारचाकी वाहनांच्या पार्कींगचे नियोजन चुकीचे केल्याने शेकडो महागड्या गाड्यांचे मॉलच्या बाहेर निघताना नाहक नुकसान होत आहे.**




पनवेलच्या ओरीयन मॉलमध्ये सणा सुदिच्या दिवशी ग्राहकांची खरेदी करीता मोठी गर्दी असते मॉल समोर महानगरपालिकेच्या अखत्यारीत असणारा रस्ता दुचाकी पार्कीगने भरलेला असतो. त्यामुळे इतर वाहन चालकांना अन्य कामाकरीता आपली वाहने तेथुन ये जा करताना अनंत अडचणी निर्माण होत असतात. मात्र रस्त्यावरील बेकायदेशीर पार्कींग कडे वाहतुक पोलीस अर्थपुर्ण दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळेच ओरीयन मॉल समोरील रस्त्यावर दुतर्फा टु व्हीलर तसेच फोर व्हीलर पार्कींग होत आहे असा आरोप सर्व सामान्य नागरिकांतुन होत आहे.

ओरीयन मॉलमध्ये येणाऱ्या ग्राहक वर्गास व्यवस्थापनाने आतील बाजूस पार्कींगची व्यवस्था केलेली असून त्याची येण्या जाण्याची रचना अतिशय किचकट आहे. मॉलच्या बाहेर निघताना असलेल्या मार्गावर महिन्याभरात शेकडो वाहनांचे अतोनात नुकसान होत असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. या अचानक झालेल्या नुकसानीमुळे ओरीयन मॉलच्या ग्राहक वर्गात नाराजी व्यक्त केली जात आहे. 'आलो खरेदीला व झाले भलतेच' असा सुर ग्राहकवर्गात उमटत आहे.


ओरीयन मॉल सुरू झाल्यापासून वर्षाकाठी हजारो गाड्यांचे नुकसान झाल्याचे समजते. बांधकाम करतेवेळी आत पार्कींग केलेल्या वाहनांकरीता बाहेर जाण्यासाठी जो वळसा घ्यावा लागतो तेथेच किमान रोज ३ ते ४ गाड्यांचे नुकसान होत आहे. याकडे ओरीयन मॉलच्या व्यवस्थापनाचे अक्षम्य दुर्लक्ष गेली अनेक वर्षे होत असल्याने ग्राहक वर्ग प्रचंड नाराज होत आहे. मॉल मध्ये अपघात झाल्याने अनेक वेळा विमा कंपन्यांनी देखील येथुन सी.सी.टी.व्ही फुटेज ग्राहक वर्गाकडुन मागीतल्याची माहिती मिळत आहे.

# आरसीएफ कंपनीत भीषण स्फोट

## 3 जणांचा मृत्यू तर 3 गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**अलिबाग तालुक्यातील थळ, वायशेत येथील केंद्र शासनाच्या अखत्यारीत असलेल्या आरसीएफ कंपनीत जीटीजी या नव्या प्लांटचे काम सुरू होते. ए टी जी प्लांट मध्ये एसी बसविण्याचे काम सुरू असताना भीषण स्फोट झाल्याची घटना घडली. या अपघातात एक मॅनेजमेंट ट्रेनीसह अन्य दोघांचा जागीच मृत्यू झाला असून तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत.**



खत निर्मिती करणारा केंद्र शासनाचा आर सी एफ प्रकल्प अलिबाग तालुक्यातील थळ येथे आहे. या कंपनीत नवीन ए सी यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम मेसर्स एरिझो ग्लोबल या कंपनीस दिले होते. या कंपनीचे कर्मचारी हे जीटीजी प्लांट मध्ये काम करीत होते. या कर्मचाऱ्यासोबत कंपनीचा कर्मचारीही होता. एसी बदलल्यानंतर ती सुरू करताना सायंकाळी पाच वाजता अचानक स्फोट झाला. या स्फोटात एक कंपनी कर्मचारी आणि दोन कंत्राटी कर्मचारी यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अन्य तीन जण हे गंभीर जखमी झाले आहेत.

या तिघांनाही आर सी एफ रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तिघांचीही प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी ऐरोली येथे हलविण्यात आले आहे.

या स्फोटात अंकित शर्मा (२७), फैजून जुनेद शेख (३२), दिलशाद आस्लाम इदनिकी (२९) हे कामगार मयत झाले आहेत. तर साहिद मोहम्मद सिद्दीकी (२३), जितेंद्र शेळके (३४), अतिनदर मनोज हे कामगार जखमी झाले आहेत.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे पोलीस आयुक्तालय नवी मुंबई येथे धडकला तडीपार मोर्चा



**दै.रायगड नगरी । उरण**

विद्यमान सरकार हुकूमशाही द्वारे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांवर विविध अत्याचार, जुलूम करत आहे. खोटे केसेस शिवसैनिकांवर दाखल केले जात आहेत.शिवसैनिकांना तडीपारचे आदेश काढले जात आहेत. त्यांच्यावर ईडी, इनकमटॅक्सची कारवाई हेतूपरस्पर केली जात आहे. खोटे केसेस करून शिवसैनिकांना त्रास दिले जात आहे. मात्र सरकारच्या या हुकूमशाहीला, दडपशाहिला शिवसैनिक अजिबात घाबरणार नाही. सरकारच्या हुकूमशाहीला, दडपशाहिला शिवसेना अजिबात भिक घालणार नाही. कोणावरही अन्याय झाल्यास उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष त्याच्या नेहमी पाठीशी उभी राहील, शिवसैनिकांनो तुम्ही घाबरू नका. आम्ही तुमच्या सोबत आहोत असे प्रतिपादन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी बेलापूर येथे केले.

सध्याचे राज्य सरकारने सूडाच्या भावनेत शिवसैनिकांवर अत्याचार सुरु केले आहेत.सरकार विरूद्ध बोलेल त्याला पोलीसी खाक्या दाखवणं, धमक्या देणे, तडीपार करणे अशा अन्यायकारक गोष्टी सुरू केल्या आहेत. म्हणूनच पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना उरण विधानसभा तर्फे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे) दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी सि पी ऑफिस, बेलापूर, नवी मुंबई येथे सकाळी ११वाजता विद्यमान सरकारच्या हुकूमशाही व मनमानी कारभाराचा निषेध करत सरकार विरोधात 'तडीपार मोर्चा' काढण्यात आला होता यावेळी भास्कर जाधव बोलत होते.

यावेळी शिवसेना पक्षावर सरकार कसे अन्याय करत आहे याचा पाढाच भास्कर जाधव यांनी सर्वांसमोर वाचला. आपल्या भाषणातून त्यांनी सरकारच्या हुकूमशाहीचा, मनमानी कारभाराचा निषेध केला. इतर मान्यवरांनीही भाषण करून आपला निषेध यावेळी व्यक्त केला. यावेळी शिवसेना नेते अरविंद सावंत, शिवसेना नेते भास्कराव जाधव, खासदार विनायक राऊत, खासदार राजन विचारे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार अजय चौधरी, आमदार सुनील प्रभू, आमदार मनीषा कायंदे, आमदार विलास पोतनीस, आमदार सुनील शिंदे, माजी आमदार मनोहरशेठ भोईर, विनोद घोसाळकर, सुभाष भोईर, जिल्हाप्रमुख केदार शिंदे, बबनदादा पाटील, विठ्ठल मोरे, द्ररकानाथ भोईर, शिरीष घरत, उपनेत्या अनिता बिर्जे, महिला जिल्हाप्रमुख सुवर्णा जोशी, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांच्यासह उरण विधानसभा मतदारसंघातील सर्व आजी–माजी शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी, युवासेनेचे पदाधिकारी, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी, आजी–माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते. उपस्थित नेत्यांनी यावेळी तडीपार मोर्चाचे आयोजन करून सरकारच्या दडपशाहीचा, हुकूमशाहीचा निषेध केला.

# ना नफा, ना तोटा या तत्वावर रवा साखर मैदा विक्री केंद्र

## प्रितम म्हात्रे गेली अनेक वर्ष राबवत आहेत सामाजिक उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम.म्हात्रे संस्थेतर्फे दिवाळीनिमित्त सर्वसामान्य लोकांना खिशाला परवडणाऱ्या दरात ना नफा, ना तोटा या तत्वावर ३ दिवसीय विक्री केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर विक्री केंद्र मंगळवार १८ ऑक्टोबर रोजी सुरू करण्यात आले आहे. १८ ते २० ऑक्टोबर पर्यन्त हे केंद्र पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, सेक्टर ९ उलवे येथे सुरू राहणार आहेत. १८ ऑक्टोबर रोजी या विक्री केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

महागाईने सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. दररोज वाढणाऱ्या महागाईवर सामाजिक बांधिलकीतून काही देणे लागतो या भावनेतून जे.एम.म्हात्रे संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी फराळासाठी आवश्यक रवा, साखर, मैदा या वस्तू जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी उपक्रम गेली अनेक वर्ष हाती घेतला आहे. सर्वसामान्य कुटुंबांना तर एकाच्या पगारावर घर कसे चालवायचे हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यातच दिवाळी हा सण तोंडावर आल्याने नागरिकांना थोडासा दिलासा म्हणून व दिवाळी हा सण आनंदाने साजरा करता यावा या उद्देशाने प्रितम म्हात्रे यांच्या संकल्पनेने दरवर्षीप्रमाणेच शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था ना नफा ना तोटा तत्वावर विक्री केंद्र उभारून नागरिकांना माफक दरात रवा, मैदा, साखर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था ना नफा ना तोटा या विक्री केंद्रांचे यंदाचे हे सातवे वर्ष आहे. याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. नामांकित व उच्च प्रतीचे एकत्रित १३६ रु. किमतीचे अर्धा किलो रवा, अर्धा किलो मैदा व एक किलो साखर माफक दर ९० रुपयामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ पनवेल, छत्रपती शिवाजी महाराज चौक, खांदा कॉलनी, डी .ए. व्ही. पब्लिक स्कुल, नवीन पनवेल, सेक्टर ९ उलवे येथे दिवाळीनिमित्त ना नफा ना तोटा या तत्वावर विक्री केंद्र उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी या विक्री केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.विरोधी पक्षनेते तथा जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांच्या तर्फे करण्यात आलेले आहे.



# रविवारी पनवेलमध्ये 'दिवाळी पहाट'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेलमध्ये सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या 'दिवाळी पहाट' चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ०६ वाजता पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे हा कार्यक्रम होणार आहे.

दरवर्षी संगीत रसिकांचा या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असतो. यंदा दिवाळी पहाटचे सहावे वर्ष असून या दिवाळी पहाट मध्ये झी मराठी लिटिल चॅम्प फेम प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे, तसेच सूर नवा ध्यास नवा स्पर्धक प्रणय पवार हे प्रसिद्ध गायक मंडळी सुश्राव्य गाण्यांची मैफिल सादर करणार आहेत. तर या सोहळ्याचे निवेदन निवेदिका धनश्री दामले ह्या करणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून या प्रवेशिकेसाठी रोहित जगताप ८६९१९३०७०९, गौरव कांडपिळे ९९२०८६८००८ किंवा अभिषेक भोपी ९८२०७०२०४३ या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच या सुरेल मैफलीचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

# देशात समृद्धी आणायची असेल तर घरांतील माता सुरक्षित असायला हवी : नरसू पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

या ठिकाणी मला आनंद वाटतो की आज साई संस्थेच्या वतीने माझ्या माता भगिनी करिता माता सुरक्षीत तर घर सूरक्षीत अभियान आयोजित करण्यात आले आहे. खर आहे जिच्या उदरी आपण जन्म घेतो ती सूरक्षीत असली पाहिजे कारण जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगा उद्धारी असे म्हटले जाते याचा दाखला इतिहासात पाहण्यास मिळतो आपण सर्वजण अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज्यांचे पुतळे पाहतो आशा थोर पुरुषाच्या मागे खंबीरपणे उभ्या होत्या त्या त्यांच्या मातोश्री जिजामाता आणि म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याची स्थापना करू शकले, म्हणूनच मी म्हणतो की माता सुरक्षीत तर घर सूरक्षीत म्हणण्यापेक्षा माता सुरक्षीत तर देश सूरक्षीत असे म्हटले तर ते वावगे ठरणारे नाही असे स्पष्ट मत साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांनी व्यक्त केले. ते उरण येथील साई संस्था संचलित नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये आरोग्य विभाग रा.जी.प. आयोजित माता सुरक्षीत तर घर सूरक्षीत अभियांतर्गत शिबिराच्या शुभारंभा प्रसंगी आपले मत व्यक्त करताना म्हणाले.



या जगात मते शिवाय काही नाही आई आपल्याला जन्म देते कर्म देते ती सूरक्षीत असली पाहिजे तिचे आरोग्य निरोगी असले पाहिजे ज्या घरची माता सूरक्षीत असले ते घर सूरक्षीत असेल म्हणून मातांचा सन्मानाचा हा दिवस आहे,या साठीच साई संस्थेच्या वतीने आणि रा.जी.प.आरोग्य विभागाच्या सहकार्याने आजचा उपक्रम हाती घेतला आहे, कारण आमच्या तालुक्यांतील माता, भगिनी जर सूरक्षीत राहतील तरच आमचा तालुका देशत सृदृढबनेल, देशात खरोखरच समृद्धी आणायची असेल तर घरा घरांतील माता सुरक्षीत असयला हावी असे त्यांनी शेवटी सांगून रा.जी.प.आरोग्य विभागासह डॉ.राजेंद्र इटकर डॉ.बाबासो कालेल, डॉ.स्वाती म्हात्रे, व त्यांच्या टीमचे आभार मानले. नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये आरोग्य विभाग रा.जी.प. आयोजित माता सुरक्षीत तर घर सूरक्षीत अभियांतर्गत महिला, स्तनदामाता, व किशोरवयीन मुलीसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ परिसरांतील ७०पेक्षा अधिक महिलांनी घेतला.

यावेळी उपस्थित पुरुषवर्गानेही आपली तपासणी करून घेतली. शिबिरचे उद्घाटन साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शिबीरा साठी उरणचे जेष्ठ पत्रकार तथा नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलचे व्यवस्थापक प्रदीप पाटील व परिसरांतील महिलामोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. शिबिरा साठी उरण तालुका आरोग्य विभाग अधिकारी डॉ.राजेंद्र इटकर, इंदिरा गांधी ग्रामीण

# संक्षिप्त...

## विद्यार्थी गुणगौरव व स्नेहसंमेलन सोहळा साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

वैश्य वाणी समाज मंडळ, खोपोली शहर यांच्यातर्फे विद्यार्थी गुणगौरव व स्नेहसंमेलन सोहळा खोपोली येथे आयोजित करण्यात आला होता. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि स्नेहसंमेलन तसेच सत्तर वर्षावरील जेष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ यावेळी करण्यात आला. श्रीराम मंगल कार्यालय, खोपोली येथे हा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात सारा झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना मुरबाड नगरपंचायतचे गटनेता नितीन लक्ष्मण तेलवणे, नगरसेविका नम्रता नितीन तेलवणे, मिसेस टुरिझम ग्लोब २०२२ ची विजेती हर्षला तांबोळी, उद्योजक योगेश तांबोळी, सरपंच देवऱ्हावे अंकित साखरे, उपसरपंच संदेश चौधरी, वैश्यवाणी समाज एक हात मदतीचा अध्यक्ष प्रदीप दलाल यांच्यासह संतोष चौधरी अध्यक्ष, हेमंत तेलवणे उपाध्यक्ष, अनिल चौधरी सेक्रेटरी, दत्तात्रय चौधरी खजिनदार, कार्यकारणी मंडळ खोपोली शहर वैश्य वाणी समाज उपस्थित होते. वैश्य वाणी समाज एकत्रित यावा यासाठी स्नेहसंमेलन सोहळा करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अनेकांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगत व्यक्त करून समाजासाठी जे काही लागेल ते देण्याची तयारी दर्शवली. समाजातील नागरिक पुढे कसे जातील यासंबंधी मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक अलोक खिसमतराव यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी पैठणीचा खेळ खेळण्यात आला. महिला पैठणीच्या मानकरी मनाली महेश पोटे ह्या ठरल्या. त्यांना पैठणी भेट देण्यात आली. या स्नेहसंमेलनाला महिलांची विशेष उपस्थिती होती.

# शनिवार पर्यंत शिधावाटप केंद्रात शासनाचे फराळाचे दिवाळी पॅकेज उपलब्ध होणार

## मा.विरोधी पक्ष नेता प्रितम म्हात्रे यांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिवाळीच्या निमित्तानं आवश्यक असलेल्या चार महत्त्वाच्या जिन्नस अवघ्या १०० रुपयांत रेशनवर उपलब्ध करून देण्याचा सरकारनं घेतला आहे. रेशनकार्ड धारकांना शंभर रुपयात रवा, साखर, चणाडाळ, तेल या चार वस्तू मिळणार आहे. या निर्णयामुळे गरिबांची दिवाळी गोड होईल अशी अपेक्षा होती. परंतु दोन दिवसांवर दिवाळी आली असताना सुद्धा या वस्तू शिधाधारकांना उपलब्ध होत नसल्याने पनवेल पालिकेचे मा.विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी नाराजी व्यक्त केली आहे. त्यासोबतच त्यांनी पुढील दोन दिवसात यासंदर्भात युद्ध पातळीवर निर्णय घेऊन शिधावाटप केंद्रामध्ये वरील वस्तू उपलब्ध कराव्यात आणि त्याचे नियोजन योग्य पद्धतीने करावे अशी विनंती त्यांनी तहसीलदार पनवेल- उरण यांना केली आहे.



महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. दिवाळीचा गोडवा वाढवण्यासाठी करंजी, चकली, लाडू, शंकरपाळे हे पदार्थ तयार केले जातात.

पण हे पदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे शासनाने गरिबांना यंदाच्या दिवाळीत रेशन दुकानातून चार फराळासाठी आवश्यक वस्तू शंभर रुपयांत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रवा, साखर, चणाडाळ आणि तेल मिळणार असून तालुक्यातील रेशन दुकानांतून या वस्तूंचे वितरण होणार आहे. अशा प्रकारची जाहिरात संपूर्ण तालुक्यामध्ये करण्यात आली. परंतु १८ ऑक्टोबर २०२२ पर्यंत एकाही शिधावाटप केंद्रावर सदरच्या वस्तू उपलब्ध नव्हत्या अशा तक्रारी नागरिकांच्या माध्यमातून पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याकडे आलेल्या होत्या. त्या संदर्भात त्यांनी तहसील कार्यालयांमध्ये संबंधित विषयात पाठपुरावा केला.

दिवाळी हा सण संपूर्ण भारतात उत्साहात साजरा करण्यात येतो. त्यामध्ये गरिबांपासून ते उच्चभ्रू लोकांपर्यंत सर्वजण साजरे करतात. यावर्षी शासनामार्फत घेण्यात आलेला हा उपक्रम खूप चांगला आहे पुढील दोन दिवसात पनवेलचे- उरण चे तहसीलदार यांनी यासंदर्भात युद्ध पातळीवर निर्णय घेऊन शिधावाटप केंद्रामध्ये वरील वस्तू उपलब्ध कराव्यात आणि त्याचे नियोजन योग्य पद्धतीने करावे असे आवाहन प्रितम जनार्दन म्हात्रे मा. विरोधी पक्ष नेता, पनवेल महानगरपालिका यांनी केले आहे.

> महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना महाराष्ट्र शासनाकडून या चांगल्या उपक्रमाचे नियोजन व्यवस्थित करणे अपेक्षित आहे. यासंदर्भात पनवेलचे तहसीलदार यांनी सांगितले की आम्हाला काही वस्तू अजून येणे बाकी आहे त्या आल्या की येत्या शुक्रवार पर्यंत सर्व केंद्रांवर वस्तू आम्ही उपलब्ध करून देऊ. तसेच उरणचे तहसीलदार यांच्याशी चर्चा केली असता त्यांच्याकडूनही शनिवार पर्यंत सर्व केंद्रांवर आवश्यक त्या वस्तू शासनाकडून मिळाल्यावर आम्ही ताबडतोब नागरिकांसाठी वस्तू उपलब्ध करून देऊ असे सांगण्यात आले
>
> **:- प्रितम जनार्दन म्हात्रे, मा. विरोधी पक्षनेते ,पनवेल महानगरपालिका**

# कोळखेत किल्ले व रांगोळी स्पर्धा ; सरपंच मीनल म्हात्रे यांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोळखे ग्रामपंचायत हद्दीत सरपंच मीनल रोहन म्हात्रे यांच्या वतीने किल्ले व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी २५ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदत दिली आहे व विजेत्यांना रोख स्वरूपात पारितोषिक दिले जाणार आहेत.

दिवाळी म्हटलं की नवीन कपडे, फटाके, रांगोळी, गोडधोड फराळ तर आलाच. पण त्यातही बच्चे कंपनीसाठी औत्सुक्याचा आणि आवडीचा विषय म्हणजे किल्ले बनवणे. परंतु, दिवाळीच्या सुट्या आणि अंगणात चिमुकल्यांनी बनवलेले मातीचे किल्ले आता पाहायला मिळत नाही. ही संस्कृती नष्ट होऊ नये यासाठी पनवेल तालुक्यातील कोळखे येथे किल्ले बांधणी व रांगोळी स्पर्धा आयोजित केली जाते. त्याचप्रमाणे बनवलेले किल्ले प्रदर्शनासाठी ठेवलं जात असून या प्रदर्शनाला दरवर्षी चांगला प्रतिसाद मिळतो.या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या विजेत्याला ५५५५, दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्याला ३३३३ आणि तिसरा क्रमांक मिळवणाऱ्या विजेत्याला २२२२ रुपयांचं पारितोषिक तसेच प्रत्येकी सन्मानचिन्ह प्रमाणपत्र दिले जाणार आहे. रांगोळी स्पर्धेसाठी विजेत्याला ३३३३, दुसरा क्रमांक २२२२ तर तृतीय क्रमांक ११११ व प्रत्येकी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

यंदाच्या वर्षीही 'किल्ले बांधणी व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून स्पर्धेत भाग घेण्यासाठी २२ ऑक्टोबर पर्येपर्यं मुदत ठेवण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी अर्ज करण्यास सुरुवात झाली आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्यांना २५ ऑक्टोबर रोजी परीक्षण केले जाणार आहे.

या स्पर्धेत भाग घेण्यासाठी संदीप जितेकर मो. नंबर.८८९८६८१७५३, ॲड.अभिजीत सुरते ७७३८०१९५९५, मच्छिंद्र डाकी ९५९४३१२१०४, आकाश पाटील ९८७०१५१२१९ यांच्याशी संपर्क साधून त्यांना किल्ले तसेच रांगोळीचे फोटो व व्हिडिओ व्हाटसप करावेत असे आवाहन रोहन म्हात्रे यांनी केले आहे.

# उरण नगर पालिकेचे दुर्लक्ष सहा दिवस पाईप लाईनचा वाळ लिकिज

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगर पालिकेच्या दुर्लक्षित पणामुळे गेली सहा दिवस गणपती चौक येथील पाईप लाईनचा वाळ लिकिज आहे. यामुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे.तरी उरण नगर पालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगले यांनी लक्ष केंद्रित करावे अशी मागणी या परिसरातील रहिवासी करत आहेत.

उरण नगर पालिकेच्या माध्यमातून उरण शहरातील रहिवाशांना, व्यापारी वर्गाला रानसई धरणातून एम.आय. डी.सीच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.उरण नगर पालिकेच्या दुर्लक्षित पणामुळे गणपती चौक येथील पाईप लाईनचा वाळ गेली सहा दिवस लिकिज आहे. त्यामुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे. एकंदरीत या परिसरातील रहिवाशांना कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने सदर पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी येथील रहिवाशांनी उरण नगर पालिकेकडे केली आहे. परंतु उरण नगर पालिकेचे कर्मचारी सदर बाबी कडे दुर्लक्ष करत आहेत. तरी उरण नगर पालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगले यांनी जातीने रहिवाशांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी रहिवाशी करत आहेत.

# प्लॅस्टिक मुक्त स्वच्छता मोहिम राबवून समुद्रकिनारा केला चकाचक



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित बॅ.ए.आर.अंतुले संकुल मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयातील एन.एस.एस.च्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी शासनाच्या प्लॅस्टिक मुक्त स्वच्छता मोहिम राबवून समुद्रकिनारा चकाचक केला.

यावेळी एन.एस.एस.चे कार्यक्रम अधिकारी डॉ.जी.डी.मुनेश्वर, व डॉ.एस.एस. भैरगुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुडच्या परेश हॉटेल परिसरातील ते विश्राम बाग पर्यंत समुद्रकिनारी असलेला कचरा, घाण, बाटल्या व प्लॅस्टिक असा दोन टन कचरा गोळा करण्यात येऊन त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए.नगरबावडी, उपप्राचार्य डॉ.विश्वास चव्हाण तसेच प्रतिनिधी मंदार सावंत, संदीप बोर्ले, मैथिल डपे, सृष्टी पाटील यांसह १५० स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्लॅस्टिक मुक्त स्वच्छता मोहिम राबविण्यात येऊन समुद्रकिनारा चकाचक करण्यात आला.

# कर्जत नगर परिषदेच्या स्वच्छता दूतांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती, कुलाबा जिल्ह्याच्यावतीने कर्जत नगरपरिषदेच्या स्वच्छता दूतांचा भेटवस्तू आणि दिवाळी फराळ देऊन मंगळवार दिनांक १८ऑक्टोबर रोजी सन्मान करण्यात आला.

कर्जत नगरपरिषद सभागृहात संपन्न झालेल्या या सोहळ्याला जनकल्याण समितीचे संभाग कार्यवाह अविनाश धाट, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, बांधकाम सभापती राहुल डाळिंबकर,आरोग्य अधिकारी सुदाम म्हसे, समितीचे विभाग कार्यवाह रविकिरण काळे, नगरसेवक, नगरसेविका व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी होत्या.

भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह नितीन भावे यांनी समितीच्या जिल्ह्यातील कामांची माहिती प्रास्ताविकात दिली. त्यानंतर कर्जत नगरपालिकेला स्वच्छता अभियानामध्ये राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या पुरस्काराबद्दल नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल तसेच अन्य पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

अविनाश धाट यांनी जनकल्याण समितीच्या संपूर्ण राज्यामध्ये चालणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.बांधकाम सभापती राहुल डाळिंबकर यांनी कर्जत नगर परिषदेला मिळालेल्या पुरस्कारामध्ये कर्मचाऱ्यांचा मोठा सहभाग असल्याचे सांगितले. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनीही कर्मचाऱ्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे कौतुक केले आणि यापुढेही कर्जत शहर स्वच्छ राहण्यासाठी कर्मचाऱ्यांनी अधिक काम करण्याचे आवाहन केले.सुदाम म्हसे यांनीही याप्रसंगी आपल्या विचार व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित स्वच्छता दूतांना जनकल्याण समितीच्या वतीने भेटवस्तू आणि दिवाळी फराळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन रवींद्र लाड यांनी केले शेवटी नितीन भावे यांनी आभार मानले.


## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान, ता.कर्जत, जिल्हा : रायगड ४१०१०२**

**ई-मेल आयडी** : mcomatheran@gmail.com

जावक क्र.मागिनप : १२०८ : २०२२-२३ दिनांक : १९/१०/२०२२

### ई-निविदा सूचना

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, जि.रायगड हे माथेरान नगरपरिषद हद्दीत ई-रिक्षाचा पुरवठा करणे या कामाचे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीद्वारे होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रक इत्यादीची माहिती माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**सही/-**
**(सौ.सुरेखा भणगे)**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
फौ.चौ.अ.क्र.१०६४/२०२२
नि.नं.७
ने.ता.२०/११/२०२२

श्री.महेश मोतीराम देशमुख
वय : वर्षे, व्यव : नोकरी
रा.प्लॉट नं.४०३, से.४४ ए, नेरुळ, नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
जन्म, मृत्यू नोंदणी निबंधक
ग्रामपंचायत गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

१) तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा कै.गोविंद राजाराम देशमुख यांचा मृत्यू दि.१७/०७/१९६२ रोजी मौजे : कोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधनाने अर्जदार यांजकडून आपल्या आजोबांच्या मृत्यूची नोंद करण्याचे राहून गेले आहे.

२) तसेच आज रोजी अर्जदार यांचे आजोबा कै.गोविंद राजाराम देशमुख यांच्या मृत्यूची नोंद कुठेच नाही. त्याबाबत ग्रामपंचायत गोवठणे, ता.उरण, जि.रायगड यांनी नोंद असल्याबाबतचा दाखला दिलेला आहे. सदरचा दाखला या अर्जाकामी अर्जदार यांनी मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

३) सदर अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कै.गोविंद राजाराम देशमुख यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता या मे.न्यायालयात दाखल अर्जास कोणाची हरकत असल्यास त्यांनी ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात तशी हरकत घ्यायची आहे असे न केल्यास अर्जदार यांनी दाखल केलेल्या सदर अर्जात आजोबा कै.गोविंद राजाराम देशमुख यांच्या मृत्यूची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **मा.प्रथमवर्ग न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **मा.प्रथमवर्ग न्याया, पनवेल**

मा.सोनावणे सो.कोर्ट
**ॲड.ज्योती कोकाटे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४६४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/१२/२०२२

१) श्रीमती.आकांक्षा जगदीश म्हसके
३) कु.श्रेया जगदीश म्हसके
२) श्रीमती.साधना वामन म्हसके — अर्जदार

अर्जदार क्रं.१ व २ रा.ए-७, टाईप-४, एकता विहार, सी.जी. एस.कॉलनी, सेक्टर २५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ व अर्जदार क्र.३ रा.वावे, सुधागड, पाली, जि.रायगड, पिन-४१०२०५

वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील व अर्जदार क्र.३ यांचा मुलगा कै.जगदीश वामन म्हसके यांचा मृत्यू दि.१६/०४/२०२२ रोजी एमपीसीटी हॉस्पिटल, सेक्टर ४, सानपाडा, नवी मुंबई येथे झाला. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका क्र.१०१, ए विंग, पहिला मजला, ओम रेसिडेन्सी को. ऑप.हौ.सोसा (नियोजित), सर्वे नं.१, हिस्सा नं.१+२+३ अ/१ व सर्वे नं.४८, हिस्सा नं.३ अ, मौजे नेवाळी, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्र ३९.१०० चौ.मी. कारपेट**
**मिळकतीचे मुल्यांकन २५,०५,६००/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९/१०/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.भद्रकुमार जमनादास सावजानी व सौ.पुष्पा भद्रकुमार सावजानी, दोघे रा.फ्लॅट नं.२०६, दुसरा मजला, डी विंग, कासा व्हिएन्ती लेकशोर खोनी, पलावा फेस २, डोंबिवली पूर्व, कल्याण, मानपाडा, कल्याण, ठाणे यांचे मालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती आमचे अशिलांनी, त्यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, तालुका : उरण, जि.रायगड**

| भूमापन / सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७१ | ६ | १-८२-०० पो.ख.०-१२-०० | ४.८० |

**आणि**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : टाकीगांव, तालुका : उरण, जि.रायगड**

| भूमापन / सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३५ | १/अ | १-५६-०० पो.ख.०-०५-५० | ४.०२ |
| ३५ | ४/अ | २-७०-०० पो.ख.०-२१-०० | ४.५३ |

येणेप्रमाणे, वर्णनाच्या जमिनीमध्ये, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकी हक्क, हक्क तिसंबा, कुळवहिवाट, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षिसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, चौदा (१४) दिवसाच्या आत, त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत, खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल, सदर जमिनीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१९/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.शैलेश डी. नाईक**
**१०४, पहिला मजला, पवन को. ऑप.हौ.सोसायटी, जिल्हा व अति.सत्र न्यायालयाचे समोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९१६७९८९१९७**

फेरचौकशी दावा

**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचे न्यायालयात**
पत्ता : पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती बिल्डींग, रायगड बाजार जवळ, मार्केट यार्ड, पनवेल-४१०२०६

फेरचौकशी दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/१३-२०२२, दि. / /२०२२
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण अपिल क्रमांक : TNC/REV/RAG/300/2018
दि.०२/१२/२०२१

## जाहीर नोटीस

१) श्री.गजानन गोमा वीर
२) श्रीमती.आंबी गोमा वीर
रा.बेलवाडी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.पंढरीनाथ शिवराम पाटील
२) श्री.काना शिवराम पाटील
रा.नानोशी, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.हरीबाई नेनुमल सिंधी
रा.पंतनगर, बिल्डींग नं.३४, मुंबई
४) मे.मेट्रो डेव्हलपमेंट तर्फे सुरेश जैन आणि
५) मनोज लक्ष्मीलाल कोठारी
रा.द अम्बीएन्स कोर्ट, युनिट नं.३०१, ३०२, ३ रा मजला, सेक्टर १९ डी, नवी मुंबई — सामनेवाले

जमिनीचे वर्णन

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | सर्व्हे नं. / हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| पनवेल | नानोशी | ७३/१क | ०-३१-६ ०-०३-७ पोख | ६.३१ |

वर वर्णन केलेल्या जमिनीबाबत मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे न्यायालयातील अपिल क्र. TNC/REV/RAG/300/2018 दि.०२/१२/२०२१ रोजी आदेश पारित केलेला आहे. मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडील वरील आदेशानुसार पक्षकारांना नोटीसा देवून निर्णय घेणेबाबत या न्यायाधिकरणास आदेशित केलेले आहे.

सदर आदेशाच्या अनुषंगाने वरील नमूद दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदापत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास दि.१६/११/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण पनवेल येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपणास (आपल्या विधिज्ञामार्फत) यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी (विधीज्ञामार्फत) कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हास काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैहजेरीत सुरूवात करण्यात येईल. प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/१०/२०२२

**सही/-**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल, रायगड**

# ‘स्वच्छता का उपहार’उपक्रमांतर्गत नागरिकांमध्ये कचरा विलगीकरणाची जनजागृती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ‘स्वच्छ भारत’सर्वेक्षण २.० मोहिम आणि माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत कचरा विलगीकरणाचे महत्व नागरिकांना पटवून देण्याकरिता ‘स्वच्छता का उपहार’ हा कार्यक्रम १६ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर या दरम्यान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ‘स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला’या उपक्रमाचे आयोजन खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल अशा चारही प्रभागांमध्ये ५० हून अधिक सोसायट्यांमध्ये त्याचप्रमाणे ४० शाळांमध्ये करण्यात आले आहे.



उपायुक्त सचिन पवार यांच्या सूचनेनूसार या उपक्रमामध्ये इन्फिनीटी फाऊंडेशनचे सदस्य आणि महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षकही भाजी बाजार, मच्छी बाजार चौकाचौकांमध्ये ‘कचरा वर्गीकरण जनजागृती कार्यक्रम’ राबवित आहे. आत्तापर्यत खारघरमध्ये पेणधर गाव, तळोजे टाऊन बाजार, घोटगाव, उत्सव चौक, खारघर गाव, अशोब बाग, पार्क डिव, श्री बालाजी सोसायटी, अरिहंत कृपा सोसायटी, पाले खुर्द अशा अनेक ठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात आले.

याचबरोबर पिल्लई महाविद्यालय, महापालिकेच्या सर्व शाळा, पिसार्वे मराठी शाळा, विसपुते महाविद्यालय अशा विविध ४० शाळांमध्ये महापालिकेच्यावतीने ‘स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला’या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना ओला कचरा व सुक्या कचऱ्याचे विलगीकरणाचे महत्व पटवून सांगण्यात आले. ओला कचरा व सुका कचरा वेगळा केला असता ओल्या कचऱ्यापासून चांगल्या पध्दतीने कंपोस्ट खत व सुक्या कचऱ्यापासून पुर्नवापर करणाऱ्या वस्तू तयार करता येतात, असा संदेश विद्यार्थ्यांना दिला जात आहे. या उपक्रमांतर्गत पनवेल प्रभागामध्ये वडाळे तलाव, शिवाजीनगर झोपडपट्टी, प्रभाग १४,तक्का गाव कर्नाळा सर्कल भाजी बाजार याठिकाणी स्वच्छता निरीक्षकांनी पोस्टर, बॅनरच्या माध्यमातून ओल्या व सुक्या कचऱ्याविषयी जनजागृती केली. या बरोबर कळंबोली प्रभागामध्ये आसूडगाव, रोडपाली गाव, भाजी बाजार, मच्छी बाजारांमध्ये जनजागृतीपर ’ राष्ट्रीय कचरा वर्गीकरण मोहीम अंतर्गत ’ कचरा समिश्रकरण थांबावे व ’कचरा मुक्त शहर अभियान’ घेण्यात आले. ‘ हमारा त्योहार– स्वच्छता का उपहार’ या केंद्रशासनाने दिवाळी सणानिमित्त तयार केलेल्या स्लोगनसहित महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागामध्ये घरगुती कचरा विलगीकरण उपक्रम राबविण्यात येत आहे.

# संक्षिप्त...

## तळा आर्टिस्ट असोसिएशन तर्फे दिवाळी निमित्त भव्य कलाप्रदर्शन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा आर्टिस्ट असोसिएशन तर्फे दिवाळी निमित्त भव्य कलाप्रदर्शन दिवाळी पहाटेची औचित्य साधून दिनांक २३ ऑक्टोंबर ते दिनांक २६ ऑक्टोंबर २०२२ असे चार दिवस चित्र–शिल्प–छायाचित्र आणि लेख–कला प्रदर्शन रोज सकाळी ७ वा. पासून सायंकाळी ७ वा. पर्यंत आयोजित केले आहे. या कला प्रदर्शनाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन तळा आर्टिस्ट असोसिएशन तर्फे करण्यात येत आहे.

तळे शहरात असा प्रयोग प्रथमच होत आहे त्यामुळे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या आर्टिस्ट., कला, साहित्य, लेखक, गीतकार अशा होतकरू युवक–युवतींना हे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते. ग्रामीण भागातही असे कलाकार दडलेले आहेत. त्यांनी पुढे येऊन या संधीचा फायदा घेत तळा आर्टिस्ट असोसिएशनची संपर्कात राहावे. जेणेकरून भविष्यात पुढील वाटचालीसाठी दिशा मिळेल.

दिनांक २३ ऑक्टोबर सकाळी ९.०० वा. पिटसई कोंड येथील ज्येष्ठ चित्रकार शिंदे गुरुजी यांच्या हस्ते कलादालनाचे उद्घाटन तर विनोद कोलवणकर यांचे हस्ते श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात येणार आहे. सकाळी ११.०० वा. आई दर्शन घेईन मी नारळ पुनव फेम सौ मीरा निलेश कार्लेकर यांची विशेष उपस्थिती सायंकाळी ५.०० वा. पंडित अजित कडकडे यांचे शिष्य डॉ. संतोष प्रकाश झापकर यांचे संगीतमय कार्यक्रम दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वा. कलाकारांचे प्रात्यक्षिक श्री कैलास सातांबेकर, श्री. आकाश शिंदे, श्री. नामदेव शिंदे तर दिनांक २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वा. छायाचित्रणावर बोलू काही श्री. समीर देशमुख आणि शार्दुल देशमुख तसेच दिनांक २६ ऑक्टोबर सकाळी १०.०० वा. श्री. श्रेयस रोडे यांचे कथाकथन असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केला आहे. याचा लाभ रसिकांनी घ्यावा असे आवाहन योगेश सुतार, आकाश शिंदे, समीर देशमुख, कैलास सातांबेकर, शार्दुल्य देशमुख, श्रेयस रोडे व रघुनाथ सातांबेकर यांनी केले आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# बाल नाट्य स्पर्धेच्या कार्यशाळेत बाल नाट्यांचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार यांनी केले मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या दोन वर्षांच्या कठीण काळानंतर शाळा नव्या उत्साहात सुरु झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला आणि ऊर्जेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाटय परिषद पनवेल यांनी केलेला असून त्या अनुषंगाने मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात मंगळवारी सायंकाळी झालेल्या बाल नाट्य स्पर्धेच्या कार्यशाळेत बाल नाट्यांचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार यांनी मार्गदर्शन केले.




चांगल्या प्रकारे व्यक्त होण्याकरीता आपल्याकडे चांगले विचार, भाषा आणि योग्य ठिकाण असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी नाटय परिषद पनवेलचे शाखेचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी सांगत वैयक्तीक विकास आणि भाषाशैली यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार यांनी बालरंग भुमीची व्याख्या उपस्थितांना सांगितली. तसेच बालरंग भुमीच्या सुरुवात आणि त्याचा इतिहास याबाबतची माहिती उपस्थितांना दिली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेलचे शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मागील सोळा वर्ष या दोन्ही संस्था अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा ही अतिशय भव्य दिव्य स्वरुपात आयोजित करीत आहे. या स्पर्धेत अनेक होतकरु रंगकर्मींनी आपला ठसा उमटवून व्यावसायिक नाटय क्षेत्रात यशस्वी पदार्पण केलेले आहे. पनवेल उरण परिसर हा सांस्कृतिकदृष्ट्या समृध्द परिसर असून हा कलाकारांचा प्रदेश आहे. विद्यार्थ्यांमधील अभिनय कलेला प्रोत्साहन मिळावे, त्यांना रंगमंच उपलब्ध व्हावा त्याचबरोबर एक सृजनशील पिढी तयार व्हावी म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक बालकात उपजतच एक नट दडलेला असतो. त्यामुळे बाल नाट्य निर्माण करणाऱ्या मार्गदर्शकांना त्यांच्या शंकांचे निरसन, आणि प्रोत्साहन देण्यासाठी परिषदेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रंगनील नाट्य संस्थेच्या अध्यक्षा कल्पना कोठारी, श्यामनाथ फुंडे, स्मिता गांधी, सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, यांच्यासह विविध विद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

# राष्ट्रीय कराटे स्पर्धेत सीकेटी विद्यालयाचे सुयश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नविन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेत बाजी मारली आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या या चमकदार कामगिरी बद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला. वर्ल्ड फुनकोबी शोतोकन कराटे आयोजित ३३ व्या नॅशनल ओपन कराटे

चॅम्पियनशीपचे स्पर्धेचे आयोजन १६ ऑक्टोबरला खारघर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. ह्या सार्धेत सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी उज्वल कामगिरी करत सुवर्ण व रौप्य पदके मिळवून आपल्या शाळेच्या नावलौकिकात भर टाकली आहे. ह्या चॅम्पियनशीपमध्ये रौनक नाकटे, श्राव्या थळे, प्रणव कांबळे, आरब झोडगे, दिशांत जाधव, ईशा चव्हाण, विघ्नेश पाटील, अर्थ पांडव यांनी सुवर्ण पदक तसेच सुहम बहिरा, दक्ष सुरते यांनी रौप्य पदक पटकावले आहे. कराटे चॉम्पियनशीपमधील यशस्वी विदयार्थ्यांचा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# अवजड वाहनांवर मर्यादीत मालवाहतुकीचे नियंत्रण गरजेचे

## अवजड वाहनांवर मर्यादीत मालवाहतुकीचे नियंत्रण गरजेचे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिघी पुणे राष्ट्रिय मार्गावरील वेडीवाकडी वळणे आणि चड उताराचे नादुरूस्त रस्ते असताना दिघी पोर्ट मधुन अवजड वाहनांमधुन कोळसा,विविध प्रकारचे रसायन, तेल, डांबर आदी ज्वलनशील पदार्थ आणि विविध यंत्रसामुग्री वाहतूक करणाऱ्या वाहनांचे क्षमतेहून अधिक (ओव्हर लोड) माल वाहतूक होत असल्याने दिघी ते माणगाव पर्यंतचा ६० किमी अंतराचा पल्ला गाठण्यासाठी त्या – त्या वाहनाची आणि गाडी चालकाची का– कु होत असताना पहायला मिळत आहे. काही वाहनांची अवजड माल वाहतूक करण्याची क्षमता २० ते २५ टन इतकी असताना ३० ते ४५ टन माल भरून माल वाहतूक होत असताना पहायला मिळत आहे. अशामुळे गाडीचा ब्रेक फेल होणे, गिअरबॉक्स तुटणे, टायर पंक्चर होणे किंवा टायर फुटणे, गाडीला झोला मारणे असे अनेक प्रकारची नादुरुस्ती होऊन अपघात होण्याच्या सर्रास घटना दिघी पोर्ट कार्यान्वीत झाले पासुन घडत आहेत.हे जरी नित्याचेच झाले असले तरी दिघी पोर्ट प्रशासनाने अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांची माल वाहतूक करण्याची क्षमता ठरल्या प्रमाणे गाडीत माल लोड करणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या वाहतुकीवर आर.टी.ओ.पेण विभाग आणि संबंधित पोलिस यंत्रणेने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे मात्र तसे होत नसल्याचे दिसून येत आहे. दिघी पोर्ट मधुन अवजड मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना प्रथम दिघी, हरवित घाट चढाव, घोणसे घाट चढाव, साई मोर्बा घाट उतार आणि म्हसळा शहर बायपास उतार वळणावर मोठी कसरत करावी लागते. अनेक ठिकाणी कमी रुंदीचा तर अनेक ठिकाणी अडवणूक करून ठेवलेल्या रस्त्यांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असल्याने अपघाताच्या व वाहन नादुरूस्त होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. हया घटना आम नागरिकांना आणि प्रवाशी वर्गासाठी धोक्याची घंटा असून या पुढे यात अधिकच भर पडणार आहे. म्हसळा घोणसे घाटात दिघी पोर्ट मधुन ओव्हर लोड माल वाहतूक करणारी वाहने गाडीची माल वाहतूक करण्याची क्षमता नसल्याने अपघाती पवनक्षेत्र असलेल्या ठिकाणी आपोआप बंद पडतात आणि दुर्घटना घडण्यास कारणीभूत ठरत आहेत.

# २२ रोजी खांब ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

सालाबादप्रमाणे याही वर्षी खांब विभागातून खांब ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन ता.२२ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले असल्याची माहिती दिंडी आयोजकांकडून देण्यात आली आहे. स्वा.सु.गुरूवर्य अलिबागकर महाराज यांचे क्रुपाशिर्वादाने व वै.गुरूवर्य गोपाळबाबा वाजे व धोंडू बाबा कोलाटकर यांचे आशिर्वादाने तसेच दिंडीचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.श्री कृष्णा महाराज जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणाऱ्या या दिंडी सोहळ्यात दरवर्षी संपूर्ण रोहे तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील मोठ्या संख्येने भाविक भक्त सहभागी होतात. तर दिंडी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष सदानंद जाधव, मारूती महाराज कोलाटकर, कृष्णाराम धनवी, प्रकाश थिटे, गणेश जाधव, एकनाथ मरवडे, ज्ञानेश्वर लोखंडे, राधिका लोखंडे, शुभांगी महाडिक आदी प्रमुख पदाधिकारी यांच्यासह अन्य कार्यकारिणी सदस्य मेहनत घेत आहेत. तर दिंडी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी सदानंद जाधव ९८२३८१५०२६, ज्ञानेश्वर लोखंडे ७४९९५२४३५४ व अजय पार्टे ८७९३८३९६८६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बालविवाह मुक्त भारत अभियानाला रायगड जिल्ह्यात प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पेण**

नोबेल शांती पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांच्या पुढाकाराने संपूर्ण देशभरात बालविवाह मुक्त भारत अभियान राबवले जात आहे. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातून कॅण्डल रॅली काढून बालविवाह मुक्त भारत अभियान जनजागृती करण्यात येत आहे. रॅलीत महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला.

पेण येथील महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था पेण, सोहम फाउंडेशन, पनवेल व सोशल एम्पावरमेंट अँड व्हालेंटरी असोसिएशन, मुंबई यांच्या माध्यमातून हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील पनवेल, पेण, कर्जत, खालापूर, उरण, अलिबाग, सुधागड, माण–गाव, रोहा, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, महाड, पोलादपूर, आणि तळा तालुक्यात तसेच माणगाव येथील मिरगुंड आदिवासी वाडी, खालापूर येथील खरीवली आदिवासी वाडी, उरण येथील चिरनेर आदिवासी वाडी अलिबाग येथील किहिम आदिवसीवाडी व विविध शाळा कॉलेजमधून कॅन्डल मार्च रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

संपूर्ण देशात बाल विवाह प्रथा नष्ट व्हावी या हेतूने हे अभियान सुरू झाले आहे. बालविवाह प्रथा करूया नष्ट, ’पहिले पढाई, फिर बधाई’, ’चलो अब शुरुवात करे बालविवाह को नष्ट करे’ असे नारे देत प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह बाबतच्या कायद्याची अंमलबजावणी व महत्त्व पालकांना पटवून देण्यात येते. व भारत बाल विवाह मुक्त बनावा ही शपथ सर्व पालकांना देऊन करण्यात येते.

महाराष्ट्र समाज विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मनोज गावंड यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम समन्वयक पंकज पाटील व संस्थेचे कर्मचारी वर्ग, सोहम फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजिरी मुळे व त्यांचे सहकारी, सामाजिक कार्यकर्ते, अशा सेविका, अंगणवाडी सेविका, बचत गटांच्या महिला सदरचे अभियान यशस्वी करण्याकरिता जनजागृती करत आहेत.


## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**

दूरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२–२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५५७५१
ई–मेल : panvelcorportation@gmail.com ई–मेल : www.panvelcorporation.com
जा.क्र./प.महा/पर्या./३९२२/प्र.क्र.४२/१५०/२०२२ दिनांक : /१०/२०२२

### जाहीर आवाहन

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पनवेल शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचन क्रमांक G.SR.682 (E) dt. 5.10.1999 अन्वये 125 dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री वापर करण्यास मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम, आर्सेनिक, लीड, मरक्युरी, यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र.१५२/२०१५ मध्ये मा.ना.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नयेत. तसेच परवानगी असलेले फटाके पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेवूनच विक्री करणेची आहे.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ३.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लॉस्टीकमुक्त व पर्यावरण पुरक सण–उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न करून सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा. प्लॉस्टीकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. सण समारंभामध्ये पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करावा. पर्यावरण पुरक प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरण पुरक दिवाळी म्हणून साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो. आपणा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**सही/–**
**(कैलास गावडे)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**



**सिडको** शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या कोंबडभुजे येथील गावठाणाच्या जमिनीवरील बांधकाम क्र. KB–३०३,३०३A हे श्री. कृष्णा काशिनाथ कोळी व श्री. लक्ष्मण मऱ्या कोळी यांचेकडून संपादित झालेली आहे. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र.१४०, सेक्टर – २५अे, क्षेत्र – १६० चौ. मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | बांधकाम क्र. | बांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| कोंबडभुजे | KB:-३०३, ३०३A | **कृष्णा काशिनाथ कोळी (मयत)**<br>**वारस:–**<br>१) श्रीमती मुक्ताबाई काशिनाथ कोळी<br>२) श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी<br>३) श्री. आनंद कृष्णा कोळी<br>४) श्री. हितेश कृष्णा कोळी<br>५) कु. सोनाली कृष्णा कोळी<br>६) सौ. गीता मंगेश कोळी<br>७) सौ. रंजना संतोष बहिरा<br>८) सौ. वर्षा अविनाश कोळी | ५१.८३ | पुष्पक वहाळ | २५अे | १४० | १६० |

कृष्णा काशिनाथ कोळी हे मयत आहेत व त्यांचे वारसांपैकी १) श्रीमती मुक्ताबाई काशिनाथ कोळी २) श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी ३) कु. सोनाली कृष्णा कोळी ४) सौ. गीता मंगेश कोळी ५) सौ. रंजना संतोष बहिरा ६) सौ. वर्षा अविनाश कोळी यांनी १) श्री. आनंद कृष्णा कोळी २) श्री. हितेश कृष्णा कोळी यांना इरादित भूखंड क्र. १४०, सेक्टर – २५अे, क्षेत्र – १६० चौ. मी. हिस्स्याचे – ५२.८५२ चौ. मी. चे हक्कसोड पत्र दुय्यम निबंधक – पनवेल – २ – २२८६ – २०२२, पावती क्र. २५६० दिनांक १५/०२/२०२२ हे सादर केले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे भूखंड क्र. १४०, सेक्टर – २५अे, क्षेत्र – १६० चौ. मी. यामधील कृष्णा काशिनाथ कोळी यांचे वारसांनी त्यांचा हिस्सा १) श्री. आनंद कृष्णा कोळी २) श्री. हितेश कृष्णा कोळी यांस देण्यास संमती दिली आहे व तसेच दुय्यम निबंधक – पनवेल यांनी १) श्री. आनंद कृष्णा कोळी २) श्री. हितेश कृष्णा कोळी यांच्या लाभात अन्वये हक्कसोड बाबत पत्र सादर केलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३०(तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही, असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

www.cidco.maharashtra.gov.in
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
सिडको/जनसंपर्क/३००/२०२२–२३